२३५८८२

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ /२०२३

**वाहतुक नियंत्रण अधिसुचना** दिनांक २४/०६/२०२३

सदर चा अंडरपास हा अरुंद असून १६ नंबरकडून काळेवाडी फाट्याकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडची रुंदी खुपच कमी आहे. तसेच त्याठिकाणा वरून पवारनगर गल्ली व थेरगावकडे जाणारी लेन असल्याने सतत वाहतूक कोंडी निर्माण होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>वाकड वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

- कावेरीनगर सब वे मधुन मो.सा.,रिक्षा खेरीज करुन इतर सर्व वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**<u>पर्यायी मार्ग</u>**

१. कावेरीनगर वेणुनगर कडून काळेवाडी फाट्याकडे जाणाऱ्या वाहन चालक गुजरनगर अंडरपास येथून इच्छित स्थळी जातील.

२.१६ नंबरकडून वेणुनगर, कावेरीनगरकडे जाणाऱ्या वाहन चालक काळेवाडी फाटा येथून यु-टर्नघेवून इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना अमंलबजावणी२५/ ९ /२०२३ पासुन प्रायोगिक तत्वावर करण्यात येत आहे.

नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त, वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.२५/ ९ /२०२३ ते दि. ९/१० /२०२३ पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करून अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन अंतिम आदेश काढण्यात येईल.

**(काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त,परि२
अति. कार्य वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी वाकड वाहतुक विभाग,

४) कार्यकारी अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner